महाराष्ट्र शासन

# सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकिय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्रं.:- ०७१२-६४६५१४५/१४६,

Web Site :- www.rdtenagpur.org.in E-Mail :- ronagpur@dtemaharashtra.gov.in

क्रमांक :- तंशिस/विकाना/डीबीटी पोर्टल /शिष्य./२०२३-२४/ 3663 दिनांक:- 24 NOV 2023

प्रति,

प्राचार्य /संचालक,

शासकीय,अनुदानित, खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित,

पदवी/पदव्युत्तर पदवी व पदविका संस्था,

नागपूर विभाग, नागपूर.

विषय :- शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता, डीबीटी पोर्टलव्दारे शैक्षणिक वर्ष २०२३-२४ विद्यार्थ्यांचे अर्ज मंजुरी करिता पाठविण्याबाबत.

संदर्भ :- १) मा. संचालक, तंशिसं, म.रा.मुंबई यांचे कार्यालयाचे पत्र. क्र.१८/तंशिसं /डीबीटी/ विकाप /२०२३-२४/२४३/ दि. २० /१० /२०२२

२) उच्च व तंत्रशि क्षण विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१७/ प्र.क्र.३३२/तांशि-४दि. ०७/१०/२०१७

३) या कार्यालयाचे पत्र क्र. तंशिस/ विकाना /शैवि / MahaDbt/ शिष्य. / २०२३-२४ / ३३६४ दि. २५/ १०/ २०२३

आपले सरकार महाडिबीटी पोर्टल (संकेतस्थळ : https://mahadbtmahait.gov.in) वर महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांचा समावेश करण्यात आलेला आहे. त्यापैकी खालील योजना तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येतात.

१) राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना

२) डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना

३) उच्च व्यावसायिक व इयत्ता १२ वी नंतर सर्व अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणा-या राज्यातील अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना .

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता, महाडिबीटी पोर्टलव्दारे विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज (नवीन /नुतनीकरण ) भरण्याची प्रक्रिया दि. ११ ऑक्टोबर २०२३ पासून सुरू करण्यात आलेली आहे. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता आपल्या संस्थेतील शिकणा-या उपरोक्त योजनांसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांकडून डीबीटी पोर्टलवरील अर्ज (नवीन/नुतनीकरण) भरुन घेण्याबाबत संस्थास्तरावरुन विद्यार्थ्यांना सुचना देण्यात यावे. व संस्था स्तरावर प्राप्त झालेले अर्ज, संस्थेला दिलेल्या दोन्ही लॉगीन मधून संबंधित योजनेंच्या शासन निर्णयातील अटी व शर्तीनुसार काटेकोरपणे तपासणी करून वेळोवेळी अचुक पात्र असलेले अर्ज मंजूरीस्तव पाठविण्याबाबत संर्भिय पत्र क्र. ०३ अन्वये आपणास कळविण्यात आलेले आहे. परंतु महाडिबीटी पोर्टल वरील डॅशबोर्ड नुसार संस्थेच्या लॉगीन ला एकुण २७७८ अर्ज प्रलंबित असल्याचे निदर्शनास आलेले आहे.

त्याअनुषंगाने सर्व संस्थांना कळविण्यांत येते की , संस्थेच्या लॉगीन ला प्रलंबित असलेले विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्तीचे अर्जाची छाननी करून पात्र असलेले अर्ज मंजूरीस्तव पाठविण्यात यावे. **तसेच योजनेस पात्र नसलेले किंवा वारंवार त्रुटी सहीत मंजूरीस्तव (approval) पाठविण्यात आलेल्या अर्जाबाबत आपणास कोणत्याही प्रकारची पुर्व सुचना न देता शिष्यवृत्तीचे अर्ज थेट रिजेक्ट करण्यात येईल. याची, प्राचार्य आणि शिष्यवृत्ती हाताळणा-या अधिकारी / कर्मचारी यांनी नोंद घ्यावी.**

**टिप:- शैक्षणिक वर्ष २०२२-२३** मधील ज्या संस्थेतील प्रवेशित विद्यार्थ्यांचे अर्ज (Institute Login & Student Login ) आणि 2nd Installment (शै. वर्ष २०१८-१९ ते २०२२-२३ उपरोक्त योजना ) अंतर्गत प्रलंबित असल्याचे निदशनास येईल, त्या संस्थांचे महाडिबीटी पोर्टल वरील **शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील मंजूरी करिता (Approval) पाठविण्यात आलेली फी** या कार्यालयामार्फत मंजूर करण्यात येणार नाही.

प्र. सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

प्रत :- मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई, (कार्यासन क्र. १८) यांना माहिती करिता सिवनय सादर.